ज्ञानगंगा घरोघरी

# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ

नाशिक– ४२२ २२२

## वाणिज्य व व्यवस्थापनशास्त्र विद्याशाखा

## सहकार व्यवस्थापन पदविका (P08) शिक्षणक्रम माहितीपुस्तिका

**2018–2019**

## *अनुक्रमणिका*


१. विद्याशाखेचा परिचय ........ ४

२. सहकार व्यवस्थापन पदविका शिक्षणक्रमाविषयी ........ ४

२.१ शिक्षणक्रमाची संरचना

२.२ प्रवेश पात्रता

२.३ शिक्षणक्रम शुल्क

२.४ कालावधी

२.५ माध्यम

२.६ मूल्यमापन प्रक्रिया

२.७ श्रेयांक (अभ्यासतासांचे परिमाण)

३. विभागीय केंद्रे ........ ७

४. अभ्यासकेंद्रे ........ ८

५. विशेष सूचना/संपर्कासाठी ........ ९

## विद्यापीठ गीत



एक प्रतिज्ञा असे आमुची ज्ञानाची साधना ।
चिरंतन ज्ञानाची साधना ।
ज्ञान हेच संजीवन साऱ्या जगताच्या जीवना ।। धृ ।।
ज्योत जागवू सुजाणतेची सकलांच्या अंतरी ।
तीच निवारील पटल तमाचे प्रभात सूर्यापरी ।
ज्ञानच देउळ, ज्ञानच दैवत, प्रगतीच्या पूजना ।। १ ।।
नव्या युगाचा नव्या जगाचा ज्ञान धर्म आहे ।
त्यातच अमुच्या उजळ उद्याचे आश्वासन राहे ।
मुक्त करिल तो परंपरेच्या बंदिघरातुन मना ।। २ ।।
हाच मंत्र नेईल आम्हाला दिव्य भविष्याकडे ।
न्यायनीतीचे पाऊल जेथे भेदाशी ना अडे ।
जे जे मंगल पावन त्याची जेथे आराधना ।। ३ ।।

*कुसुमाग्रज*


**निर्मिती**

श्री. आनंद यादव
व्यवस्थापक, ग्रंथनिर्मिती केंद्र, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक ४२२ २२२



© २०१७, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक



- **प्रथम प्रकाशन** : मे २०१८
- **अक्षरजुळणी** : ॲकोसिस, नाशिक – १०
- **प्रकाशक** : डॉ. दिनेश भोंडे, कुलसचिव, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक ४२२ २२२

**NB-18-19-06 (dip_sahakar…P08)**

# १. विद्याशाखेचा परिचय

वाणिज्य आणि व्यवस्थापन विद्याशाखा हा मुक्त विद्यापीठाचा एक महत्त्वाचा भाग आहे. विद्यापीठाच्या स्थापनेपासून ही विद्याशाखा कार्यरत आहे. सन १९९१ पासून भारताने मुक्त धोरणाचा स्वीकार केल्यानंतर देशात तसेच आंतरराष्ट्रीय क्षेत्रात प्रचंड घडामोडी झाल्या. माहिती, तंत्रज्ञान आणि संगणक युगात पारंपरिक व्यापार पद्धतीला फाटा देऊन इंटरनेट, ई–कॉमर्स अशा संज्ञा रूढ झाल्या. त्यानुसार शिक्षणपद्धतीच्या तंत्रज्ञानातही बदल करावा लागला. व्हर्च्युअल शिक्षणपद्धती, सीडीच्या माध्यमातून विविध विषयांची माहिती करून देणे, इंटरनेटवरून आवश्यक ते संदर्भ विद्यार्थ्यांना उपलब्ध करून देणे, उपग्रहाद्वारे शिक्षण तसेच अद्ययावत तंत्रज्ञानाने युक्त अशा माहितीचे स्रोत विद्यार्थ्यांना प्राप्त करून देणे अशांसारख्या सोई विद्यार्थ्यांना उपलब्ध झाल्याने विद्यार्थ्यांच्या ज्ञानार्जनाच्या क्षमतेत निश्चितच वाढ झाल्याचे दिसून येते आणि हे कार्य वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेने यशस्वीपणे पार पाडले आहे.

वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेत तीन पदव्युत्तर शिक्षणक्रम, पाच पदवी शिक्षणक्रम आणि चार पदविका शिक्षणक्रम चालविले जातात. या शिक्षणक्रमात एम. बी. ए., एम. कॉम, बी. कॉम., बीसीएम, सहकार व्यवस्थापन पदविका, इत्यादी शिक्षणक्रमांचा समावेश आहे. वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेची उद्दिष्टे पुढीलप्रमाणे सांगता येतील.

### उद्दिष्टे

(१) व्यापार–उद्योग, व्यवस्थापनशास्त्र, सहकार, इत्यादी क्षेत्रांतील व्यवहारज्ञान प्राप्त करून बहुश्रुतता वाढविणे.

(२) कार्यालये, संस्था, कंपन्या ह्यांच्यासाठी प्रशिक्षित मनुष्यबळ उपलब्ध करून देणे.

(३) सातत्याने होणाऱ्या सुधारणा/बदल यांसाठी विद्यार्थ्यांना सक्षम बनविणे.

(४) विद्यार्थ्यांमध्ये उद्योजकता विकास गुण वृद्धिंगत करणे.

(५) संशोधन कार्यातून वाणिज्य व व्यवस्थापनशास्त्र प्रगल्भ करणे.

(६) प्रसिद्धीच्या माध्यमातून विविध शिक्षणक्रम सर्वदूर पसरविणे.

(७) व्यवस्थापक होऊ पाहणाऱ्यांना ज्ञानार्जनाच्या संधी उपलब्ध करून देणे.

(८) समृद्ध जीवन जगण्यासाठी ज्ञानात्मक आधार देणे.

(९) सहकार क्षेत्रासाठी आवश्यक मनुष्यबळ तयार करणे.

# २. सहकार व्यवस्थापन पदविका शिक्षणक्रमाविषयी

## २.१ शिक्षणक्रमाची संरचना

### (अ) सहकार व्यवस्थापन पदविका शिक्षणक्रम

**शिक्षणक्रम संकेतांक P08**

'सहकार व्यवस्थापन पदविका' हा शिक्षणक्रम एकूण ४० श्रेयांकांचा आहे. यात पुढील अभ्यासक्रमांचा समावेश आहे.

(१) (MGM-218) सहकार : तत्त्वे आणि कार्यपद्धती - 8 श्रेयांक
(२) (MGM-219)सहकारी व्यवस्थापन व प्रशासन - 8 श्रेयांक
(३) (MGM-220)सहकारी कायदा व इतर कायदे - 8 श्रेयांक
(४) (MGM-221) सहकारी जमाखर्च, बँकिंग व लेखापरीक्षण - 8 श्रेयांक
(५) (MGM-222) स्थिती अभ्यास व तोंडी परीक्षा - 8 श्रेयांक

### अभ्यासक्रम

***सहकार व्यवस्थापन पदविका शिक्षणक्रम***

**शिक्षणक्रम संकेतांक P08**

**(MGM 218) सहकार : तत्त्वे आणि कार्यपद्धती**

पुस्तक १ : सहकार : इतिहास व तत्त्वे
पुस्तक २ : सहकारी अर्थव्यवस्था व कार्यपद्धती
पुस्तक ३ : सहकारी कृषी पतपुरवठा, प्रक्रिया व पणन व्यवस्था
पुस्तक ४ : कृषीपूरक उद्योग आणि नागरी सहकारी संस्था

**(MGM 219) सहकारी व्यवस्थापन व प्रशासन**

पुस्तक १ : व्यवस्थापन तत्त्वे व कार्य
पुस्तक २ : सहकारी व्यवस्थापन
पुस्तक ३ : सहकारी प्रशासन भाग – १
पुस्तक ४ : सहकारी प्रशासन भाग – २

**(MGM 220) सहकारी कायदा व इतर कायदे**

पुस्तक १ : महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व नियम १९६१ भाग – १
पुस्तक २ : महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व नियम १९६१ भाग – २
पुस्तक ३ : महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व नियम १९६१ भाग –३
पुस्तक ४ : सहकारी संस्थांच्या संबंधित अन्य कायदे

**(MGM 221) सहकारी जमाखर्च, बँकिंग व लेखापरीक्षण**

पुस्तक १ : सहकारी संस्थांतील हिशेबाची व अन्य पुस्तके भाग –१
पुस्तक २ : सहकारी संस्थांतील हिशेबाची व अन्य पुस्तके भाग – २
पुस्तक ३ : सहकारी बँकिंग
पुस्तक ४ : सहकारी लेखापरीक्षण

**(MGM 222) स्थिती अभ्यास**

पुस्तक १ : सहकारी संस्था : निवडक संस्थांचा स्थिती अभ्यास

## २.२ प्रवेश पात्रता

**खालीलपैकी कोणतीही एक पात्रता पूर्ण असणाऱ्या व्यक्ती**

(१) कोणत्याही शाखेचा पदवीधर.

किंवा

(२) १२वी अथवा तत्सम परीक्षा उत्तीर्ण आणि नोंदणीकृत सहकारी संस्थेतील ३ वर्षे कामाचा अनुभव.

किंवा

(३) अनुभव नसल्यास मा. सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचा आदेश क्र. एडीएम/२-अे/सेक्शन ७४(१)/१९९६ दि.६/८/१९९६ अन्वये सहकारी संस्थांमधील अधिकारी/सेवकांनी जीडीसी ॲण्ड ए / एच.डी.सी.एम./ डी.सी.एम./ किंवा सदर आदेशात नमूद करण्यात आलेली अन्य शैक्षणिक अर्हता धारण केली असेल असा विद्यार्थी.

किंवा

(४) एस. एस. सी. किंवा तत्सम परीक्षा उत्तीर्ण आणि नोंदणीकृत सहकारी संस्थेतील ५ वर्षे कामाचा अनुभव किंवा अनुभव नसल्यास वरील क्र. (३) मध्ये दर्शविलेल्या मा. सहकार आयुक्त यांच्या आदेशानुसार.

सदर माहितीपुस्तिकेत शैक्षणिक अर्हतेची माहिती देण्यात आली असून ती आपण पाहावी.

### विशेष सूचना

(१) प्रवेश-अर्जासोबत खालील कागदपत्रे जोडणे अत्यंत आवश्यक आहे.

(अ) शाळा सोडल्याच्या दाखल्याची प्रमाणित सत्यप्रत (Attested Photo Copy)

(आ) शैक्षणिक पात्रतेबाबतच्या गुणपत्रकांच्या प्रमाणित सत्यप्रत

(२) १0वी किंवा १२वी उत्तीर्ण विद्यार्थ्यांनी सहकारी संस्थेतील कामाचा अनुभव असल्याचा दाखला सक्षम अधिकाऱ्याच्या सही शिक्क्यानिशी अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.

(३) एस.एस.सी. किंवा तत्सम परीक्षा उत्तीर्ण आणि जीडीसी ॲण्ड ए किंवा तत्सम पात्रता धारण करणाऱ्या विद्यार्थ्यांनी गुणपत्रकांच्या प्रमाणित सत्यप्रती अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.

(४) विद्यार्थ्यांनी प्रवेश-अर्जासोबत कोणत्याही प्रमाणपत्राची मूळ प्रत जोडू नये. जोडल्यास विद्यापीठ सदर प्रत / प्रती परत पाठविणार नाही व या संदर्भात पत्रव्यवहार केला जाणार नाही.

(५) वरील पात्रताधारक विद्यार्थी इतरत्र शिक्षण घेत असतानाही ह्या शिक्षणक्रमास प्रवेश घेऊ शकतो. उदाहरणार्थ, डी.एड., ए.टी.डी., एलएल.बी., इत्यादी शिक्षणक्रम चालू असताना सहकार व्यवस्थापन पदविका शिक्षणक्रमासाठी प्रवेश घेता येईल.

## २.३ शिक्षणक्रम शुल्क

### (अ) (P08) सहकार व्यवस्थापन पदविका शिक्षणक्रम

| | |
|---|---|
| विद्यापीठ शुल्क (ऑनलाईन) | रु. २५००=00 |
| + अभ्यासकेंद्र शुल्क | रु. १000=00 |
| **एकूण शिक्षणक्रम शुल्क** | **रु. ३५००=00** |

## विद्यापीठ शुल्काचा तपशील

| *अ.क्र.* | *शुल्काचे शीर्षक* | *शुल्क (रु.)* |
|---|---|---|
| 0१. | नोंदणी प्रवेश शुल्क | १00=00 |
| 0२. | शैक्षणिक शुल्क | ४00=00 |
| 0३. | परीक्षा (अंतर्गत/अंतिम) शुल्क | ७00=00 |
| 0४. | संकीर्ण खर्च | १५0=00 |
| 0५. | विकासनिधी | ११५0=00 |
| 0६. | अभ्यासकेंद्र शुल्क | १000=00 |
| | **एकूण शिक्षणक्रम शुल्क (रु.)** | **३५00=00** |

### शुल्क भरण्यासंबंधी सूचना

(१) विद्यापीठ शिक्षणक्रम शुल्क रु. २,५००/- विद्यापीठाने निर्धारीत केलेल्या पद्धतीनेच (ऑनलाईन) भरावे लागेल.

(२) अभ्यासकेंद्र शुल्क अभ्यासकेंद्रावर भरून त्याची पावती घ्यावी.

## २.४ कालावधी

मुक्त शिक्षणपद्धतीत विद्यार्थी काम करता करता शिक्षण घेत असल्यामुळे अध्ययन-कालावधीबाबत लवचीक धोरण ठेवण्यात आले आहे. त्यामुळे एका वर्षात करावयाचा अभ्यास विद्यार्थी आपल्या सोयीने ते वर्ष संपल्यानंतरही करू शकतो. म्हणून सहकार व्यवस्थापन पदविका शिक्षणक्रम एक वर्षाचा असला तरी विद्यार्थ्यांस तो आपल्या सोयीने प्रवेश घेतल्यापासून तीन वर्षांपर्यंत पूर्ण करण्याची मुभा देण्यात आली आहे. अभ्यास पूर्ण झाल्याची खात्री झाल्यावर परीक्षा देता येण्याची स्वायत्तता विद्यार्थ्याला येथे देण्यात आली आहे.

## २.५ माध्यम

सर्व अभ्यासक्रमांसाठी मराठी माध्यम राहील. या अभ्यासक्रमांची पाठ्यपुस्तके, श्रवणफिती, चित्रफिती, अभ्यासक्रमांचे मार्गदर्शन, गृहपाठ, वर्गचाचणी व अंतिम परीक्षेच्या प्रश्नपत्रिका मराठी भाषेतून राहतील.

काही विद्यार्थ्यांच्या गरजा लक्षात घेता विद्यार्थ्यांना इंग्रजी किंवा हिन्दी भाषेत उत्तरे लिहिता येतील. मात्र सर्व प्रश्नांची उत्तरे एकाच भाषेत (इंग्रजी अथवा हिन्दी) लिहिणे अनिवार्य आहे.

## २.६ मूल्यमापन प्रक्रिया

या शिक्षणक्रमासाठी विद्यार्थ्यांचे मूल्यमापन तीन पद्धतींनी करण्यात येईल.

(१) अंतर्गत मूल्यमापन,

(२) स्थिती अभ्यास व तोंडी परीक्षा आणि

(३) अंतिम परीक्षा.

### अंतर्गत मूल्यमापन

उपर्युक्त शिक्षणक्रमासाठी गृहपाठ व MGM 221 साठी **संगणक प्रात्यक्षिक किंवा गृहपाठ** असेल.

### (अ) गृहपाठ

(१) सहकार व्यवस्थापन पदविका शिक्षणक्रमातील MGM218, MGM219 आणि MGM220 या तीनही अभ्यासक्रमासाठी प्रत्येकी २५ गुणांचे एकूण तीन गृहपाठ विद्यार्थ्यांना देण्यात येतील.

गृहपाठ विद्यापीठाच्या मूल्यमापन विभागाकडून पाठविण्यात येतील. किंवा विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात येतील. सूचनेत दिलेल्या तारखेच्या आत लेखी अभ्यास जमा करणे आवश्यक आहे. यासाठी प्रश्नसंच मुख्यालयातून पाठविण्यात येतील. विद्यार्थ्यांनी गृहपाठ पूर्ण केल्यानंतर त्यांचे परीक्षण अभ्यास केंद्रावरील संमंत्रकांकडूनच करण्यात येईल. **ज्या शैक्षणिक वर्षात प्रवेश घेतला असेल त्याच वर्षात गृहपाठ पूर्ण करणे अपेक्षित असून त्यासाठी विद्यार्थ्यांना पुन्हा संधी देण्यात येणार नाही.**

### (आ) संगणक प्रात्यक्षिक

उपर्युक्त चारही शिक्षणक्रमांसाठी संगणक प्रात्यक्षिक परीक्षा वर्षाच्या शेवटी घेण्यात येईल. सदर प्रात्यक्षिक सहकारी जमाखर्च (MGM 221) या अभ्यासक्रमाशी संबंधित असेल. संगणक प्रात्यक्षिक हे अंतर्गत मूल्यमापनाचा भाग आहे. एकूण २५ गुणांचे हे प्रात्यक्षिक अभ्यासकेंद्रावर घेण्यात येईल. त्याचे परीक्षण संबंधित अभ्यासक्रमाचे संमंत्रक करतील. ज्या शैक्षणिक वर्षात प्रवेश घेतला असेल त्याच वर्षात संगणक प्रात्यक्षिक पूर्ण करणे अपेक्षित असून त्यासाठी विद्यार्थ्यांना पुन्हा संधी देण्यात येणार नाही. संगणक प्रात्यक्षिक दिले नसेल तेव्हा गृहपाठ देण्यात येईल.

### (इ) स्थिती अभ्यास व तोंडी परीक्षा (MGM 222)

उपर्युक्त शिक्षणक्रमांसाठी ठरवून दिलेल्या किंवा विद्यार्थ्यांनी निवडलेल्या एखाद्या सहकारी संस्थेचा स्थिती अभ्यास (Case Study) विद्यार्थ्यांना करावा लागेल. त्यासाठी संबंधित संस्थेला प्रत्यक्ष भेट देणे, त्यांच्याकडून माहिती मिळवून संस्थेच्या वार्षिक अहवालाचे मूल्यमापन करणे, इत्यादी बाबतीत अभ्यास करून तो केंद्रसंयोजकाकडे विहित मुदतीत सादर करावा लागेल.

ज्या संस्थेचा स्थिती अभ्यास केला असेल त्या संस्थेच्या सक्षम अधिकाऱ्याकडून उपस्थितीबाबतचा दाखला स्थिती अभ्यासासोबत जोडणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांनी केंद्रसंयोजकाकडे स्थिती अभ्यासाचा अहवाल सादर केल्यानंतर केंद्रसंयोजक सर्व स्थिती अभ्यास विद्यापीठाकडे ठरवून दिलेल्या मुदतीत सादर करतील. स्थिती अभ्यासाचे मूल्यमापन विद्यापीठाकडून करण्यात येईल. यासाठी ७५ गुण ठेवण्यात आले आहेत.

वर्षाच्या शेवटी विद्यार्थ्यांची विद्यापीठ नामनिर्देशित करेल अशा सक्षम अधिकाऱ्यांकडून तोंडी परीक्षा घेण्यात येईल. त्यासाठी २५ गुण ठेवण्यात आले आहेत. तोंडी परीक्षेत सर्व अभ्यासक्रमांवर आधारित तसेच स्थिती अभ्यास यावर प्रश्न विचारण्यात येतील. याप्रमाणे स्थिती अभ्यास आणि तोंडी परीक्षा यांचे अनुक्रमे ७५+२५=१०० पैकी गुण देण्यात येतील.

### अंतिम मूल्यमापन

प्रत्येक अभ्यासक्रमाची १०० गुणांची ३ तास वेळ असणारी अंतिम परीक्षा घेण्यात येईल. साधारणत: अंतिम परीक्षा मे महिन्यात असेल. अंतिम परीक्षेचे स्वरूप पुढीलप्रमाणे –

(१) प्रश्नपत्रिका ही एकूण ८० गुणांची असून त्यामध्ये मुख्य ५ प्रश्न असतील. प्रत्येक प्रश्नामध्ये ५ उपप्रश्न दिले जातील. कोणतेही ४ प्रश्न सोडवावयाचे आहेत. याप्रमाणे प्रश्नपत्रिकेत एकूण ४ प्रश्न त्यामध्ये एकूण २० उपप्रश्न असतील त्यापैकी विद्यार्थ्याने एकूण १६ उपप्रश्न सोडवावयाचे आहेत.

### सूचना

(१) प्रत्येक अभ्यासक्रमात स्वतंत्रपणे **उत्तीर्ण होण्यासाठी किमान ४० टक्के गुण मिळविणे अनिवार्य राहील.**

(३) MGM 222 या अभ्यासक्रमात ७५ पैकी व २५ पैकी मिळालेल्या गुणांची बेरीज करण्यात येईल. स्थिती अभ्यास व तोंडी परीक्षा ह्या मूल्यमापनाच्या घटकात एकत्रितपणे उत्तीर्ण होणे आवश्यक राहील. उत्तीर्ण होण्यासाठी किमान ४० टक्के गुण मिळविणे अनिवार्य राहील.

(४) MGM 221 या अभ्यासक्रमाची प्रश्नपत्रिका मराठी तसेच इंग्रजी माध्यमातून असेल.

(५) सर्व अभ्यासक्रमात मिळालेल्या गुणांची बेरीज करून विद्यार्थ्यांस प्रतिशत गुण दर्शविण्यात येतील.

## २.७ श्रेयांक (अभ्यासतासांचे परिमाण)

सामान्यत: एका अभ्यासक्रमासाठी विद्यार्थ्याला ३० ते ३५ घड्याळी तासांचा वेळ लागतो. मुक्त शिक्षणपद्धतीत या अध्ययन तासांचे मापन 'श्रेयांका'च्या परिमाणात केले जाते. ३० ते ३५ अध्ययन तासांचा

अभ्यास म्हणजे १ श्रेयांक. या अभ्यासात अध्ययन पुस्तकांचे वाचन, टिपणे काढणे, मनन-चिंतन करणे, प्रश्नोत्तरे लिहिणे, संपर्कसत्रातील मार्गदर्शन, इत्यादींचा समावेश आहे.

सामान्यत: आठ श्रेयांकांचा म्हणजेच २४० ते २८० अध्ययन तासांचा एक अभ्यासक्रम असतो. पदविका परीक्षेसाठी एकूण ३२ ते ४८ श्रेयांकांचा अभ्यासक्रम पूर्ण करावा लागतो.

## ३. विभागीय केंद्रे

(१) **अमरावती :** य.च.म.मुक्त विद्यापीठाचे अमरावती विभागीय केंद्र,
व्ही.एम.व्ही. ते वलगाव रोड, पोस्ट व्ही.एम.व्ही.
अमरावती – ४४४ ६०४
✆ : (०७२१) २५३१४४४
फॅक्स : २५३१४४५

(२) **औरंगाबाद :** य.च.म.मुक्त विद्यापीठाचे औरंगाबाद विभागीय केंद्र
सर्व्हे नं. ४१, सैनिकी मुलांच्या वसतिगृहाच्या पूर्वेस
नंदनवन कॉलनी, छावणी
औरंगाबाद – ४३१ ००२
✆ : (०२४०) २३७१०७७ / २३७१०६६
फॅक्स : (०२४०) २३७१०८८

(३) **मुंबई :** य.च.म.मुक्त विद्यापीठाचे मुंबई विभागीय केंद्र
द्वारा : जगन्नाश शंकरशेठ म.न.पा.ची मराठी शाळा,
दुसरा मजला, फ्रेअर ब्रीज (साऊथ), नाना चौक
ग्रँट रोड (प.) मुंबई – ४०० ००७
✆ : (०२२) २३८७४१८६/२३८७४१७७
फॅक्स : (०२२) २३८१३२५६

(४) **नागपूर :** य.च.म.मुक्त विद्यापीठाचे नागपूर विभागीय केंद्र
रावबहादूर डी., लक्ष्मीनारायण बंगला
विद्यापीठ क्रीडा परिसर, लॉ कॉलेज कँपस
रविनगर चौक, नागपूर – ४४० ००१
✆ : (०७१२) २५५३७२४/ २५
फॅक्स : २५५३७२५

(५) **नाशिक :** य.च.म.मुक्त विद्यापीठाचे नाशिक विभागीय केंद्र,
नाशिक महानगरपालिकेची जुनी इमारत, दुसरा मजला
नवीन पंडित कॉलनी, नाशिक -४२२ ००२
✆ : (०२५३) २३१७०६३ फॅक्स : २५७६७५६

(६) **पुणे :** य.च.म.मुक्त विद्यापीठाचे पुणे विभागीय केंद्र
शाहीर अण्णाभाऊ साठे प्रशालागृह,
महापालिका शाळा क्र.५ (मुलांची),
६५४, सदाशिव पेठ हौदासमोर, कुमठेकर मार्ग
पुणे -४११ ०३०
✆ : (०२०) २४४५७९१४
फॅक्स : २४४९११०७

(७) **कोल्हापूर :** य.च.म.मुक्त विद्यापीठाचे कोल्हापूर विभागीय केंद्र
शिवाजी विद्यापीठ परिसर पोस्ट ऑफीसजवळ
विद्यानगर, कोल्हापूर – ४१६ ००४
✆ : (०२३१) २६०७०२२
फॅक्स : २६०७०२३

(८) **नांदेड :** य.च.म.मुक्त विद्यापीठाचे नांदेड विभागीय केंद्र
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ क्रीडा इमारत
नांदेड – ४२१ ६०६
✆ : (०२४६२) २२९९४० / २८३०३८
फॅक्स : २२९९५०

# ४. अभ्यासकेंद्रे

## शिक्षणक्रम : सहकार व्यवस्थापन पदविका

| क्र. | अभ्यासकेंद्र संकेतांक | अभ्यासकेंद्र | पत्ता | दूरध्वनी |
|---|---|---|---|---|
| १. | १२८६अ | **अमरावती विभागीय केंद्र**<br>राष्ट्रीय सहकारिता विकास तथा ग्रामीण प्रबंधन संस्था | बालाजी प्लॉट, गोपालप्रभा मंगलकार्यालयासमोर अमरावती – ४४४ ६०१ | (०७२१) २५७८५६३/ २५७८५५६<br>भ्रमणध्वनी – ९४२२१५६४२३ |
| २. | ११५३अ | नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ पिपल्स एज्युकेशन अँड ट्रेनिंग फॉर सोसायटीज अँड वर्कस् | कृष्णाऊ, कीर्तीनगर, गोरक्षण रोड अकोला – ४४४ ००४ | (०७२४) २४५९३९६ |
| ३. | २१९७अ | **औरंगाबाद विभागीय केंद्र**<br>आदर्श महिला नागरी सहकारी बँक | ३१, शिवज्योती कॉलनी, एन ६ सिडको, औरंगाबाद – ३ | (०२४०) २४८११८१ / २४८६७६३ / २४८३५५८<br>फॅक्स – २४८३५४८ |
| ४. | ३३८७अ | **मुंबई विभागीय केंद्र**<br>मसने अँड असोसिएशन | बी १०३, अंकिता अपार्टमेंट मधुरम हॉलसमोर, रेल्वे स्टेशनजवळ एच.एस.जोशी मार्ग, दहिसर (पूर्व) मुंबई – २२ | केंद्रसंयोजक – ९८६९००३८७३<br>(०२२) २८२८०८८६ |
| ५. | ३५३१५ | जीवनदीप कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय | मु. गोवेली, पो. रायते, ता. कल्याण जि. ठाणे | (०२५१) २३९०९२२ |
| ६. | ६२१६८ | **पुणे विभागीय केंद्र**<br>सुभाष भाऊराव कुळ महाविद्यालय | केडगाव, ता. दौंड, जि. पुणे ४१२ २०३ | (०२११९) २२४५३४ |
| ७. | | पुणे जिल्हा नागरी सहकारी पतसंस्था फेडरेशन लि., भारत इंग्लिश स्कूल | दुसरा मजला, शिवाजीनगर पुणे – ४११ ००५ | (०२०) २५५३०२०५ |
| ८. | ५४१७७ | **नाशिक विभागीय केंद्र**<br>नाशिक जिल्हा नागरी सहकारी बँक्स असोसिएशन | ४, पहिला मजला, विश्वज्योती अपार्ट. हॉटेल प्रकाशच्या पाठीमागे, गोविंदनगर, नाशिक – ४२२ ००९ | (०२५३) २४७११११ |
| ९. | ७१२५६ | **कोल्हापूर विभागीय केंद्र**<br>दिलासा सामाजिक विश्वस्त संस्था | 'दिशा', एस.बी.आय.कॉलनी कोल्हापूर | ९४२२०४३३९९ |

## ५. विशेष सूचना / संपर्कासाठी

### (अ) अभ्यासकेंद्रासंबंधीच्या सूचना

०१. प्रवेशाची मुदत संपल्यानंतर संपर्कसत्रे केव्हा सुरू करण्यात येतील, त्यासंबंधी अभ्यासकेंद्रावर जाऊन वेळापत्रक पाहावे. ओळखपत्रावर अभ्यासकेंद्र प्रमुखांची स्वाक्षरी व शिक्का घ्यावा. अभ्यासकेंद्रात येताना व परीक्षेच्या वेळी ओळखपत्र असणे आवश्यक आहे.

०२. **मुदतीत प्रवेश घेणाऱ्यास अध्ययन साहित्य अभ्यासकेंद्रावर मिळेल.**

०३. विद्यापीठाशी आपण वेळोवेळी केलेला पत्रव्यवहार, फी भरल्याच्या पावत्या, बँकेतील चलन, इत्यादी कागदपत्रे जपून ठेवावीत. विद्यापीठ आपणास कायम नोंदणी क्रमांक (PRN = Permanent Registration Number) देते. प्रत्येक वेळेस पत्रव्यवहार करताना, अभ्याससाहित्य घेताना, परीक्षा देताना PRN लिहिणे आवश्यक आहे. PRN अभ्यासकेंद्रावरून मिळवावा.

०४. विद्यापीठाने स्थापन केलेल्या अभ्यासकेंद्राव्यतिरिक्त अन्य कोणत्याही खाजगी संस्था किंवा शिकवणी वर्गांना (क्लास) विद्यापीठाची मान्यता नाही. अशा संस्थेत किंवा **'क्लास' मध्ये प्रवेश घेतल्यास किंवा जादा शुल्क भरल्यास विद्यापीठ जबाबदार असणार नाही.**

०५. अभ्यासकेंद्राशी सतत संपर्क ठेवणे आपल्या हिताचे आहे. पत्रव्यवहाराद्वारे आपणास माहिती न मिळाल्यास केंद्रावर माहिती मिळू शकेल.

०६. विद्यापीठाने केलेल्या नियोजनाप्रमाणेच वर्गचाचणी आणि अंतिम परीक्षा अभ्यासकेंद्रावर घेण्यात येतात, त्यात बदल केला जात नाही.

०७. विद्यापीठाकडून गृहपाठ अभ्यासकेंद्रामार्फत दिले जातील. ते केवळ अभ्यासाच्या सरावासाठी आहेत. त्यांची उत्तरे लिहून पाहा. काही अडचणी असल्यास संबंधित अभ्यासक्रमाच्या मार्गदर्शक–अध्यापकांकडून मार्गदर्शन घ्यावे.

०८. अभ्यासकेंद्रावर पुरेशी विद्यार्थी नोंदणी झाली नसल्यास विद्यार्थ्यांना जवळच्या केंद्रावर संपर्कसत्र व परीक्षेस वर्ग (Transfer) करण्यात येईल.

### (इ) विद्यापीठाचे मुख्यालय

'ज्ञानगंगोत्री परिसर', गंगापूर धरणाजवळ, नाशिक ४२२ २२२. दूरध्वनी क्र. (०२५३) २२३१७१४, २२३१७१५, २२३०२२७.

विद्यार्थ्यांना विद्यापीठाच्या नाशिक येथील कार्यालयात यावयाचे असेल तर अशोकस्तंभ बसस्टॉपवर सकाळी ९.३० व सायंकाळी ५.०० वाजता बसेस उपलब्ध आहेत. अशोकस्तंभ मध्यवर्ती बस (जुने सी.बी.एस.) स्थानकापासून जवळ आहे.

**विद्यापीठ व विभागीय केंद्र यांच्या कार्यालयीन वेळा पुढीलप्रमाणे आहेत –**

- सकाळी १०.०० ते सायंकाळी ५.४५ (दुपारी १.३० ते २ सुटी)
- रविवार, प्रत्येक महिन्याचा पहिला व तिसरा शनिवार आणि शासकीय सुटीच्या दिवशी वरील कार्यालये बंद राहतील.

### ■ विशेष अडचणींबाबत संपर्क

१. **माहितीपुस्तिका, अभ्यासकेंद्र अडचणी :**
शिक्षणक्रम संयोजक, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा
दूरध्वनी : (०२५३) २२३१४७७
विभागीय संचालक, विभागीय केंद्र

२. **अभ्यासक्रम (विषय) यांतील अडचणी :**
संचालक, वाणिज्य व व्यवस्थापनशास्त्र विद्याशाखा
दूरध्वनी – (०२५३) २२३१४७७

३. **नोंदणी, नोंदणी क्रमांक, पत्ताबदल, केंद्रबदल :**
उपकुलसचिव, नोंदणी कक्ष
दूरध्वनी –(०२५३) २२३०११८

४. **परीक्षा, परीक्षा-अर्ज, परीक्षा क्रमांक , निकाल, पदवी प्रमाणपत्र, इत्यादी :**
उपकुलसचिव, परीक्षा कक्ष, युनिट १
दूरध्वनी – (०२५३) २२३०७१६

५. **अध्ययन-साहित्य, पुस्तके, कार्यपुस्तिका, ध्वनिफिती, चित्रफिती, ओळखपत्र, इत्यादी :**
भांडार अधिकारी, भांडार व जावक कक्ष
दूरध्वनी – (०२५३) २२३०१०७

६. **गृहपाठाबद्दल व स्थितीअभ्यासाबद्दल : माहितीसाठी**
प्रमुख, मूल्यमापन केंद्र
दूरध्वनी – (०२५३) २२३००७३

७. **अभ्यासकेंद्रासंदर्भात अडचणी**
संचालक, विद्यार्थी सेवा विभाग
दूरध्वनी – (०२५३) २२३०२२९